# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.९३२/२०२१/अहिल्यानगर मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.विनायक उर्फ गणेश विलास ठाकूर<br>रा.६५४, तोफखाना, ठाकूर गल्ली,<br>मु.पो.ता.जि.अहिल्यानगर. | निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, अहिल्यानगर.<br>ता.जि.अहिल्यानगर. | तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, अहिल्यानगर.<br>ता.जि.अहिल्यानगर. |

<u>विवेचन</u>

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.२९/१२/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मला अपिल क्रमांक ६/२०२० दि.३/३/२०२० च्या निर्णय रोजनामा अशा सर्व कागदपत्रांच्या नकला हव्या आहेत. वरील नकला राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांच्याकडे सादर केलेल्या अपिलसंदर्भात लागत आहेत. सदरील माहिती झेरॉक्स स्वरुपात देण्यात यावी व त्या प्रत्येक पानाची रु.२/- प्रमाणे फी भरण्यास तयार आहे."

२. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.१६/०१/२०२४ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नगर ता.जि.अहिल्यानगर यांच्याविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा तात्काळ आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

३. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि.२९/१२/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर यांनी विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच आयोगासमोर द्वितीय अपिल सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याव्यतिरिक्त आयोगाच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर यांनी आयोगाकडे अद्यापपर्यंत कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. यावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर (माहिती अर्जाच्या दिनांकास कार्यरत) यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार

मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जिल्हाधिकारी, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.९३२/२०२१/अहिल्यानगर अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर.

---

जावक क्र. ८८८ दिनांक :- 04 FEB 2026